दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ | वर्ष - १ | अंक - ३१९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

**आजचे पंचांग**

दिनांक : १७ ऑगस्ट २०२६ वार : सोमवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : पंचमी तिथी (सायंकाळी ०५:०० पर्यंत) त्यानंतर षष्ठी तिथी नक्षत्र : चित्रा नक्षत्र (१८ ऑगस्ट पहाटे ०४:५८ पर्यंत) त्यानंतर स्वाती नक्षत्र योग : शुभ योग (१८ ऑगस्ट पहाटे ०३:२८ पर्यंत) त्यानंतर शुक्ल योग करण : बलवा करण (सायंकाळी ०५:०० पर्यंत) त्यानंतर कौलव करण

**आरक्षण उपवर्गीकरणासाठी १८ ऑगस्टला जनआक्रोश महामोर्चा**

**पुणे :** अनुसूचित जातीतील आरक्षणाचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी १८ ऑगस्ट रोजी पिंपरी-चिंचवडमध्ये 'जनआक्रोश महामोर्चा' काढण्यात येणार आहे. आरक्षण उपवर्गीकरण समर्थन समितीतर्फे चिंचवड स्टेशन येथील आद्यक्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे स्मारकापासून सकाळी १० वाजता मोर्चाला सुरुवात होऊन निगडी तहसील कार्यालयासमोर सांगता होणार आहे. ५८ जातींचे प्रतिनिधी तसेच मातंग, वाल्मिकी, वडार व मादिगा समाज सहभागी होणार आहेत.

## हायकोर्ट लिपिक परीक्षा गोंधळावर विद्यार्थ्यांचा एल्गार; 'विद्यार्थी नापास नाही, सरकार नापास!'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

हायकोर्टाच्या लिपिक पदाच्या ऑनलाइन परीक्षेत कथित तांत्रिक गोंधळ झाल्याने संतप्त परीक्षार्थींनी रविवारी (१६ ऑगस्ट) संभाजीनगर येथे ठिय्या आंदोलन सुरू केले. परीक्षा केंद्रांवरील सर्व्हर ठप्प होणे, संगणकांचे की-बोर्ड आणि माऊस व्यवस्थित काम न करणे अशा गंभीर तक्रारी परीक्षार्थींनी केल्या आहेत. या आंदोलनाला कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी उपस्थित राहून पाठिंबा दिला.

परीक्षार्थींच्या म्हणण्यानुसार, परीक्षा सुरू झाल्यानंतर अवघ्या दहा मिनिटांत अनेक केंद्रांवरील ऑनलाइन यंत्रणा कोलमडली. त्यामुळे वेळ वाया गेल्याने आणि परीक्षा सुरळीत न झाल्याने परीक्षार्थींच्या कामगिरीवर थेट परिणाम झाल्याचा आरोप आहे. ऑनलाइन परीक्षा घेण्याची पुरेशी तांत्रिक तयारी नसेल, तर परीक्षा आयोजितच का केली, असा संतप्त सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला.



आंदोलनाला पाठिंबा देताना दीपके यांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र टीका केली. यात विद्यार्थी नापास झाले नसून सरकार नापास झाले आहे, असा घणाघात करत त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्व मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलनस्थळावरून हलणार नसल्याचा निर्धार व्यक्त केला. शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरू असेल, तर शेवटपर्यंत विद्यार्थ्यांसोबत राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, परीक्षेतील गोंधळामुळे काही परीक्षार्थींनी तीव्र मानसिक अस्वस्थता व्यक्त केली असून, परिस्थिती गांभीर्याने घेण्याची गरज निर्माण झाली आहे. अशा संवेदनशील स्थितीत प्रशासनाने केवळ आश्वासने न देता तातडीने ठोस निर्णय घेण्याची मागणी होत आहे.

लिपिक परीक्षा रद्द करून फेरपरीक्षा घेण्यात यावी, तसेच संपूर्ण तांत्रिक गोंधळाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी आहे. जिल्हा न्यायाधीशांनी स्वतः उपस्थित राहून फेरपरीक्षेबाबत लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

फेरपरीक्षेचा निर्णय आणि चौकशी होईपर्यंत ठिय्या आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा देण्यात आल्याने हायकोर्ट लिपिक परीक्षा प्रकरण प्रशासनासाठी नवी डोकेदुखी ठरण्याची चिन्हे आहेत.

## सारांश वृत्त

### 'आता आमच्या बाया चपला काढतील'; जरांगेंचा सरकारला थेट इशारा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जालना : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे आहेत. मराठा समाजातील अभ्यासकांच्या बैठकीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार निशाणा साधत २९ ऑगस्टच्या आंदोलनातून सरकारला धडक देण्याचा निर्धार व्यक्त केला. आंदोलनात जीव गेला तरी मागे हटणार नाही, असा आक्रमक इशाराही त्यांनी दिला.

हैदराबाद गॅझेटिअर तसेच सातारा, कोल्हापूर, पुणे आणि बॉम्बे गॅझेटिअरच्या आधारे मराठा समाजाच्या मागण्यांबाबत सरकारने ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका जरांगे यांनी मांडली. सरकारने शोधलेल्या ५८ लाख नोंदींच्या आधारे प्रमाणपत्रधारकांना वैधता मिळाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. अण्णासाहेब पाटील विकास महामंडळाच्या लाभार्थ्यांचे रखडलेले व्याज परतावे देण्याची मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरून मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि शिरसाट यांच्यावरही जरांगे यांनी गंभीर आरोप केले. सरकारमधील नेत्यांनी मराठा समाजाच्या भावनांचा अवमान करू नये, असा इशारा देत फडणवीस-शिंदे यांनी झालेल्या चुका दुरुस्त कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

विशेष म्हणजे, आंदोलन मुंबईकडे अचानक वळण्याची शक्यता असल्याचे संकेतही जरांगे यांनी दिले. 'वर्षा बंगला आमचा नाही का?' असा सवाल करत त्यांनी सरकारला थेट आव्हान दिले. 'आता आमच्या बाया चपला काढतील,' या वक्तव्याने त्यांच्या आक्रमक भूमिकेची तीव्रता स्पष्ट झाली.

मात्र २९ ऑगस्टचे आंदोलन आंतरवाली सराटीत शांततेत होईल, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सरकारसमोर एकीकडे संवादाचा मार्ग खुला ठेवत दुसरीकडे आंदोलनाची धार कायम ठेवण्याचे आव्हान उभे राहिले आहे. आता फडणवीस सरकार या वाढत्या दबावाला कसे उत्तर देते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## कावडच्या नावाखाली मांसाहारावर निर्बंध; आता न्यायालयीन दारातही प्रश्न अनुत्तरित?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वाशिम : प्रतिनिधी**

कावड यात्रेच्या काळात मांसाहारी दुकाने बंद ठेवण्याच्या कथित कारवाईविरोधातील जनहित याचिका अलाहाबाद उच्च न्यायालयाने फेटाळली आणि याचिकेला **'Publicity Interest Litigation'** ठरवले. न्यायालयाचा हा निर्णय विशिष्ट याचिकेच्या कायदेशीर ग्राह्यतेबाबत असू शकतो; मात्र त्यातून उभा राहणारा मोठा सामाजिक प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही.धर्माच्या नावाखाली एखाद्या नागरिकाच्या खाण्याच्या सवयीवर अप्रत्यक्ष दबाव आणला जात असेल, तर त्याच्या हक्कांचे संरक्षण कोण करणार?

जनहित याचिका ही प्रसिद्धी मिळवण्याचे साधन नसावे, याबाबत कोणतेही दुमत नाही. सर्वोच्च न्यायालयानेही यापूर्वी **PIL** चा वापर **genuine public wrong** आणि **fundamental rights** च्या संरक्षणासाठी व्हावा, असे स्पष्ट केले आहे. मात्र प्रश्न याचिकाकर्त्यांच्या हेतूपुरता मर्यादित नाही. प्रश्न असा आहे की मांसाहार करणाऱ्या नागरिकांचे अधिकार खरोखरच धोक्यात आले असतील, तर त्याविरोधात न्यायालयीन परीक्षणाची दारे किती खुली आहेत? उत्तर प्रदेशातील कावड यात्रेच्या मार्गांवर धार्मिक भावना लक्षात घेऊन प्रशासनाकडून काही मार्गदर्शक सूचना दिल्या जात असतील, तर त्या कायद्याच्या चौकटीत आणि सर्व नागरिकांच्या अधिकारांचा समतोल राखून असणे आवश्यक आहे. धार्मिक श्रद्धेचा आदर करणे ही लोकशाहीची जबाबदारी आहे; पण त्याच वेळी धार्मिक श्रद्धा ही दुसऱ्या नागरिकाच्या जीवनपद्धतीवर बंधन घालण्याचा परवाना ठरू शकत नाही. मांसाहार करणे हा गुन्हा नाही. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात कोणी शाकाहारी असणे जितके वैध आहे, तितकेच कायद्याने परवानगी असलेल्या मांसाहाराचे सेवन करणेही वैध आहे. एखाद्याला मांसाहार आवडत नाही म्हणून दुसऱ्यानेही तो करू नये, हा आग्रह घटनात्मक लोकशाहीच्या मूलभूत भावनेशी विसंगत ठरू शकतो. याहून गंभीर प्रश्न व्यवसायाच्या स्वातंत्र्याचा आहे. एखाद्या दुकानदाराकडे कायदेशीर परवाना असेल, स्वच्छता आणि अन्नसुरक्षेचे नियम तो पाळत असेल, तर केवळ धार्मिक यात्रेच्या पार्श्वभूमीवर त्याचा व्यवसाय बंद करण्याचा आदेश दिला जात असेल, तर त्यामागे स्पष्ट कायदेशीर आधार असणे आवश्यक आहे. प्रशासनाने श्रद्धा आणि कायदा यांच्यातील सीमारेषा पुसू नये. न्यायालयाने या विशिष्ट याचिकेत पुराव्याअभावी हस्तक्षेप करण्यास नकार दिला असेल, तर त्याचा अर्थ प्रशासनाला अमर्याद अधिकार मिळाला असा अजिबात नाही. उलट, भविष्यात अशा कारवाईचे अधिकृत आदेश, कागदपत्रे आणि प्रत्यक्ष परिणाम समोर आले, तर त्यांचे घटनात्मक परीक्षण होणे आवश्यक आहे. कारण लोकशाहीत अल्पसंख्याकांची किंवा वेगळ्या जीवनशैलीची बाजू लोकप्रिय आहे की नाही, यावर त्यांचे अधिकार ठरत नाहीत. बहुसंख्यांच्या भावनांचा आदर आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे संरक्षणदोन्ही एकाच वेळी शक्य आहे. धार्मिक यात्रेच्या व्यवस्थेसाठी वाहतूक नियंत्रण करा, कायदा-सुव्यवस्था राखा, स्वच्छता आणि सुरक्षा सुनिश्चित करा; पण नागरिकाच्या ताटात डोकावण्याचा अधिकार कोणालाही देऊ नका. प्रशासनाने मांसाहारी दुकाने बंद करण्याचा निर्णय घेतला असेल तर त्याचा स्पष्ट कायदेशीर आधार दाखवावा; नसेल तर अफवा आणि दबावाच्या आधारे व्यवसाय बंद करण्याची पद्धत रोखली पाहिजे.

## 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र'चा नवा संकल्प; जुन्या घोषणांचा हिशेब कोण देणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राला कायम% स्वरूपी दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातून पुन्हा एकदा जाहीर केला. महाराष्ट्राला देशाच्या विकासाचे 'ग्रोथ इंजिन' बनविण्याचे उद्दिष्ट मांडताना शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. मात्र, दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या यापूर्वीच्या घोषणांचे काय झाले? हा प्रश्न या नव्या संकल्पाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मंत्रालयात ८०व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या विकासाचा रोडमॅप मांडला. केंद्रातील सरकारच्या कामगिरीचा दाखला देत भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झाल्याचा दावा त्यांनी केला. मात्र महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील वास्तव पाहता केवळ मोठ्या आर्थिक आकडेवारीने दुष्काळ, शेतीचे संकट आणि पाण्याची टंचाई दूर होणार का, हा सवाल उपस्थित होत आहे.

महाराष्ट्रात जलसंधारण, नदीजोड, जलयुक्त शिवार, सिंचन प्रकल्प आणि पाणीपुरवठा योजनांच्या माध्यमातून दुष्काळावर मात करण्याचे अनेक संकल्प आणि घोषणा यापूर्वी करण्यात आल्या. काही योजनांमधून सकारात्मक परिणामही दिसून आले; परंतु दर काही वर्षांनी राज्यातील अनेक भागांना पाणीटंचाई आणि दुष्काळाचा सामना करावा लागतो. त्यामुळे 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र' ही घोषणा आता प्रत्यक्ष परिणामांच्या कसोटीवर उतरवावी लागणार आहे.

विशेषतः शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण कुटुंबांच्या जीवनात कायमस्वरूपी बदल घडवून आणायचा असेल, तर केवळ पावसाळ्यातील उपाययोजनांपेक्षा दीर्घकालीन जलव्यवस्थापन, सिंचनाची कार्यक्षमता आणि भूजल संवर्धनावर भर देण्याची गरज आहे. सरकारचा नवा संकल्प स्वागतार्ह असला तरी मागील घोषणांची पूर्तता, खर्च झालेल्या निधीचा हिशेब आणि प्रत्यक्ष निर्माण झालेली सिंचन क्षमता याचा सार्वजनिक लेखाजोखा मांडल्याशिवाय 'दुष्काळमुक्त महाराष्ट्र'चा दावा किती विश्वासार्ह ठरणार? हा मूलभूत प्रश्न कायम आहे. आता महाराष्ट्राला घोषणा नव्हे, तर पाण्याची शाश्वत हमी हवी आहे.

## लोकशाहीत सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीश कायदेशीर छाननीच्या पलीकडे नाहीत बीसीआयच्या कारवाईचा नाल्सार स्टुडंट कौन्सिलकडून तीव्र निषेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली/हैदराबाद : प्रतिनिधी**

''एक घटनात्मक लोकशाही म्हणून कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला कायदेशीर आणि विधायक टीकेपासून पूर्णपणे सूट दिली जाऊ शकत नाही; यामध्ये सर्वोच्च न्यायालय आणि देशाचे सरन्यायाधीश (उगख) यांचाही समावेश आहे,'' अशा स्पष्ट शब्दांत नाल्सार (छअङडअठ) स्टुडंट कौन्सिलने बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या (इउख) भूमिकेचा तीव्र निषेध केला आहे.प्रकरणाची पार्श्वभूमी आणि मुख्य वाद:विद्यार्थ्यांचे अंतर्गत पत्र: नाल्सार युनिव्हर्सिटीच्या सुमारे ७० पदवीधर विद्यार्थ्यांनी आगामी दीक्षांत समारंभासाठी सरन्यायाधीश सूर्यकांत यांना मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित न करण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाला अंतर्गत पत्र लिहिले होते. सरन्यायाधीशांच्या काही पूर्वीच्या वादग्रस्त तोंडी वक्तव्यांवर आक्षेप घेत विद्यार्थ्यांनी हा पवित्रा घेतला होता.बार कौन्सिलची आक्रमक कारवाई: या पत्राची दखल घेत बार कौन्सिल ऑफ इंडियाचे (इउख) अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांनी १३ ऑगस्ट रोजी सर्व राज्य बार कौन्सिलना निर्देश जारी केले. या ''मोहिमेमागील'' सूत्रधारांचा शोध लागेपर्यंत नाल्सारच्या २०२६ च्या बॅचमधील कोणत्याही विद्यार्थ्याची वकील म्हणून नोंदणी (एपर्अेश्रश्राशपीं) गोठवण्याचा आदेश त्यांनी दिला.देशव्यापी संताप आणि माघार: बीसीआयच्या या निर्णयावर देशभरातून तीव्र टीका झाल्यानंतर आणि चौफेर दबाव वाढल्यानंतर, अवघ्या काही तासांतच बीसीआयने आपल्या आदेशात सुधारणा केली आणि १४ ऑगस्ट रोजी हा निर्णय पूर्णपणे मागे घेतला.स्टुडंट कौन्सिलने मांडलेले प्रमुख मुद्दे:न्यायालयीन उत्तरदायित्व आवश्यक: स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला जारी केलेल्या आपल्या अधिकृत निवेदनात विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले की, न्यायालयीन उत्तरदायित्व आणि पारदर्शकता ही न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याला पूरक आहे, विरोधी नाही.स्वातंत्र्याचा अधिकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे दाखले: कौन्सिलने 'जावेद अहमद हजम विरुद्ध महाराष्ट्र राज्य' या ऐतिहासिक खटल्याचा दाखला दिला. संविधानाच्या कलम १९(१)(अ) अंतर्गत शांततापूर्ण आणि कायदेशीर मार्गाने मतभेद किंवा असहमती व्यक्त करण्याचा अधिकार नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना सुरक्षित आहे, याची आठवण त्यांनी करून दिली.भीतीच्या वातावरणाचा निषेध: अशा प्रकारच्या प्रशासकीय अतिरेकाचा आणि विद्यार्थ्यांना धमकावण्याच्या प्रयत्नांचा कायदेशीर क्षेत्रातील सर्वांनीच विरोध केला पाहिजे, असे आवाहनही कौन्सिलने केले.सर्वोच्च न्यायालयाचा बार कौन्सिलला तीव्र झटका:या संपूर्ण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून हस्तक्षेप करत बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या भूमिकेवर गंभीर ताशेरे ओढले आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने बीसीआयला फटकारताना म्हटले:''माझ्या आणि विद्यार्थ्यांच्या दरम्यान येणारे बार कौन्सिल ऑफ इंडिया कोण आहे? बीसीआयचा या विषयात कोणताही संबंध नाही... हा संवाद माझ्या आणि विद्यार्थ्यांमधील आहे.''सर्वोच्च न्यायालयाने नाल्सारच्या कोणत्याही विद्यार्थ्यावर किंवा प्राध्यापकांवर कोणतीही दंडात्मक किंवा कठोर कारवाई करण्यास बीसीआयला स्पष्ट शब्दांत मनाई केली आहे, तसेच या अधिकार क्षेत्राच्या उल्लंघनाबद्दल बार कौन्सिलकडे लेखी स्पष्टीकरण मागितले आहे.

## देशात आगामी जनगणनेसाठी अधिसूचना जाहीर

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

देशातील आगामी जनगणनेसाठी केंद्र सरकारने ४० प्रश्नांची अमिहत्वाचे म्हणजे, लोकांनी सांगितलेली जात थेट नोंदवली जाईल, यासाठी पर्यायांची यादी नसेल.

बघा प्रश्नांची संपूर्ण यादी...

१. व्यक्तीचे नाव
२. कुटुंब प्रमुखाशी असलेले नाते
३. लिंग
४. जन्मतारीख आणि वय
५. सद्य वैवाहिक स्थिती
६. विवाहाच्या वेळचे वय
७. पती/पत्नीचे नाव
८. घोषित राष्ट्रीयत्व
९. धर्म
१०. अनुसूचित जाती (डउ) / अनुसूचित जमाती (डढ) / जात
११. वडिलांचा तपशील
१२. आईचा तपशील
१३. अपंगत्व (दिव्यांगत्व)
१४. मातृभाषा आणि ज्ञान असलेल्या इतर भाषा
१५. साक्षरता आणि डिजिटल साक्षरतेची स्थिती
१६. शिक्षण संस्थेतील उपस्थिती/शिक्षणाची स्थिती
१७. सर्वोच्च शैक्षणिक पात्रता आणि शाखा/विषय
१८. गेल्या एका वर्षादरम्यान कधीही काही काम केले आहे का?
१९. आर्थिक उपक्रमांची श्रेणी
२०. व्यवसाय / पेशा
२१. उद्योग, व्यापार किंवा सेवेचे

## पुण्यात २२ ऑगस्टला 'विद्यार्थ्यांचा आवाज'; राहुल गांधींच्या कार्यक्रमातून तरुणाईच्या प्रश्नांना राजकीय धार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी काँग्रेसकडून सुरू करण्यात आलेल्या 'विद्यार्थ्यांचा आवाज' अभियानाचा पुढील टप्पा २२ ऑगस्ट रोजी पुण्यात पार पडणार आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असून, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसोबतच विद्यार्थिनींचे हक्क, सुरक्षा, समानता आणि शिक्षण व रोजगारातील संधी यावर चर्चा होणार आहे. त्यामुळे पुण्यातील कार्यक्रमाला राजकीयदृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

देशातील तरुणाई ही केवळ निवडणुकीतील मतदार नसून देशाच्या भवितव्याची निर्णायक शक्ती आहे, असा संदेश राहुल गांधी या अभियानाच्या माध्यमातून देत आहेत. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित समस्या, बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा, वाढती असमानता आणि संधींचे केंद्रीकरण यांसारखे प्रश्न सातत्याने चर्चेत असताना 'विद्यार्थ्यांचा आवाज' हे अभियान कितपत प्रभावी ठरते, याकडे लक्ष लागले आहे.

विशेषतः विद्यार्थिनींच्या प्रश्नांवर कार्यक्रमात भर दिला जाणार आहे. मुलींना समानता, सुरक्षितता, निर्णयस्वातंत्र्य आणि समान संधी मिळणे हा केवळ राजकीय मुद्दा नसून सामाजिक जबाबदारीचा विषय आहे. मात्र प्रत्यक्षात असुरक्षितता आणि भेदभावाचा सामना करावा लागत असल्याचा राहुल गांधींचा दावा आहे.

यापूर्वी प्रयागराज, कोटा आणि डेहराडून येथे अभियानांतर्गत कार्यक्रम झाले आहेत. प्रयागराजमध्ये राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांना देशाची मोठी ताकद संबोधत 'दर्द, डेटा और दौलत' या



मुद्द्यांवर भाष्य केले होते. देशातील सुमारे ४० कोटी तरुणांची क्षमता योग्य दिशेने वापरली तर देशाच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते, असा त्यांचा दावा आहे.

आता पुण्यातील कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना केवळ भाषणांपुरते मर्यादित न ठेवता ठोस राजकीय अजेंड्यावर आणण्याचे आव्हान काँग्रेससमोर आहे. तरुणाईच्या प्रश्नांना आवाज मिळणार की पुन्हा राजकीय घोषणांमध्येच ते हरवणार? याचे उत्तर पुण्यातील कार्यक्रमातून मिळण्याची अपेक्षा आहे.

## संपादकीय

### मतपेटीच्या वयाआधीच रस्त्यावर उतरलेले विद्यार्थी; शिक्षणव्यवस्थेला हा इशारा आहे!

देशातील राजकारणात "Gen Z'च्या आंदोलनांची चर्चा सुरू असतानाच आता त्यापेक्षाही लहान वयातील **Generation Alpha** रस्त्यावर उतरू लागली असेल, तर हा केवळ आंदोलनांचा विस्तार नाही; हा देशाच्या शिक्षणव्यवस्थेला मिळालेला गंभीर इशारा आहे. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्रातील शाळकरी मुलांनी शिक्षकांची कमतरता, वर्गखोल्या, ग्रंथालये, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वीज, सुरक्षित रस्ते, शिष्यवृत्ती आणि वाहतूक यांसारख्या मूलभूत प्रश्नांसाठी आवाज उठवणे ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे. ज्यांच्या हातात अजून मतदानाचा अधिकार आलेला नाही, ज्यांना निवडणुकीत सरकार निवडता येत नाही, अशी मुले जर शाळेची दारे बंद करून रस्त्यावर उतरली, वाहतूक रोखली आणि प्रशासनाला जाब विचारू लागली, तर प्रश्न या मुलांच्या शिस्तीचा नसून व्यवस्थेच्या संवेदनशीलतेचा आहे.

शाळेत शिक्षक नाहीत, तर शिक्षण कसे होणार? वर्गखोली अपुरी असेल, तर विद्यार्थ्यांनी कुठे बसायचे? मुलींसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित स्वच्छतागृह नसेल, तर 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा कशासाठी? पिण्याचे स्वच्छ पाणी आणि वीज उपलब्ध नसेल, तर डिजिटल शिक्षणाच्या गप्पा कशासाठी? शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नसेल, तर गरीब विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा खर्च कसा भागवायचा? हे प्रश्न मुलांनी निर्माण केलेले नाहीत; हे प्रश्न प्रशासनाच्या अपयशातून निर्माण झाले आहेत. विशेष म्हणजे, या आंदोलनांमागील मागण्या कोणत्याही मोठ्या राजकीय घोषणेपेक्षा अधिक मूलभूत आहेत. शिक्षकांच्या रिक्त जागा भरा, अनावश्यक बदल्या थांबवा, वर्गखोल्या बांधा, ग्रंथालये सुरू करा, स्वच्छतागृहे द्या, पाणी आणि वीज द्या, शिष्यवृत्ती वेळेवर द्या आणि शाळेत जाण्यासाठी परवडणारी वाहतूक उपलब्ध करा इतक्या साध्या मागण्यांसाठी मुलांना रस्त्यावर यावे लागणे ही शिक्षणाच्या अधिकाराचीच विडंबना आहे. आजची **Generation Alpha** माहितीच्या युगात वाढत आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे त्यांना देशातील एका भागात घडणारी घटना दुसऱ्या क्षणी समजते. त्यामुळे आपल्या शाळेची अवस्था आणि इतरत्र उपलब्ध असलेल्या सुविधा यातील फरकही त्यांच्या लक्षात येतो. पूर्वी विद्यार्थी प्रश्न विचारत नसत, सहन करत असत. आजची पिढी मात्र 'का?' हा प्रश्न विचारते. आणि हा प्रश्न प्रशासनाला सर्वाधिक अस्वस्थ करणारा आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातही शाळांच्या मूलभूत सुविधांबाबत प्रश्न उपस्थित होत असतील, तर केवळ मोठमोठ्या शैक्षणिक योजना जाहीर करून उपयोग नाही. शाळांच्या इमारतींची छायाचित्रे, डिजिटल वर्गांच्या उद्घाटनांचे सोहळे आणि कागदावरील आकडे यापेक्षा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला महत्त्व द्यावे लागेल. विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरणे योग्य की अयोग्य, यावर प्रशासनाने वाद घालण्यात वेळ घालवू नये. वाहतूक रोखणे किंवा शाळा बंद पाडणे योग्य नाही, हे निश्चित. मात्र आंदोलनाची पद्धत चुकीची म्हणून मागण्याही चुकीच्या ठरवणे हा त्याहून मोठा अन्याय ठरेल. मुलांनी शाळेच्या मूलभूत सुविधांसाठी आंदोलन करण्याची वेळच का आली, याचे उत्तर आधी प्रशासनाने द्यावे. आज **Gen Z** प्रश्न विचारत आहे; उद्या **Generation Alpha** त्याच प्रश्नांना अधिक तीव्रतेने सामोरे जाईल. या पिढीला फक्त परीक्षा, गुण आणि प्रमाणपत्रे नकोत. त्यांना सुरक्षित, सक्षम आणि सन्मानजनक शिक्षण हवे आहे. म्हणून सरकारने या आंदोलनांकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून नव्हे, तर शिक्षणव्यवस्थेच्या आरोग्याचा 'रेड अलर्ट' म्हणून पाहिले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात शाळानिहाय मूलभूत सुविधांचे तातडीने ऑडिट झाले पाहिजे. शिक्षकांची रिक्त पदे भरली पाहिजेत. शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत मिळाली पाहिजे. मुलींसाठी सुरक्षित स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वीज आणि सुरक्षित रस्ते ही सुविधा नव्हे तर हक्क आहेत.

कारण आज रस्त्यावर उतरलेली ही मुले केवळ स्वतःसाठी प्रश्न विचारत नाहीत. ती उद्याच्या भारताच्या शिक्षणव्यवस्थेला आरसा दाखवत आहेत.

हा आरसा फोडण्यापेक्षा त्यात दिसणारा चेहरा बदलण्याची गरज आहे!

# विभाजन विभीषिका दिनानिमित्त भाजपचा पिंपरीत मूक मोर्चा

## सिंधी समाजाचा मोठा सहभाग; फाळणीतील विस्थापितांच्या स्मृतींना उजाळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेशाच्या आदेशानुसार १४ ऑगस्ट रोजी 'विभाजन विभीषिका दिन' पाळण्यात आला. यानिमित्त पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या वतीने पिंपरी येथे सायंकाळी भव्य मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चात सिंधी समाजासह हिंदू समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

पिंपरीतील डिलक्स चौक येथून मूक मोर्चाला सुरुवात झाली. शगुन चौक आणि साई चौक मार्गे मोर्चा बी. टी. अडवाणी धर्मशाळा येथे पोहोचला. तेथे मोर्चाचा समारोप करण्यात आला. भारताच्या फाळणीदरम्यान विस्थापित झालेल्या आणि विविध प्रकारच्या यातना सहन केलेल्या नागरिकांच्या स्मृतींना यावेळी उजाळा देण्यात आला.




मोर्चात भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्नबापू काटे, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनी जगताप, हर घर तिरंगा अभियानाचे प्रदेश सहसंयोजक अनुप मोरे, जिल्हा संयोजक मोरेश्वर शेडगे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, सरचिटणीस मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडये, महिला मोर्चाच्या अध्यक्षा सुजाता पलांडे, युवा मोर्चाचे अध्यक्ष दिनेश यादव, गटनेते प्रशांत शितोळे, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, स्थायी समितीच्या माजी सभापती उषाताई वाघेरे, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

याशिवाय नगरसेवक बाबा त्रिभुवन, सचिन तापकीर, प्रवक्ते राजू दुर्गे, अजित कुलथे, मंडलाध्यक्ष मोहन राऊत, मंगेश धाडगे, शिवराज लांडगे, धरम वाघमारे, मनिष पंजाबी, कुणाल साठे, ऋषिकेश वाघेरे, गणेश ढाकणे, कैलास सानप, नंदू भोगले, सचिन राऊत, महेश मोटवानी, सुरेश हेमनानी, गोपाल केसवानी, हिरालाल रिझवानी, हेमंत राजस्थ, यशवंत भोसले आदी सहभागी झाले.

महिला पदाधिकाऱ्यांमध्ये उषा वाघेरे, अनिता वाळुंजकर, आरती चोंधे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. तसेच विशाल वाळुंजकर, रवींद्र देशपांडे, बिभीषण चौधरी, संजय पटनी, मदन गोयल, मामा मारणे, सुधीर कुदळे, ओमप्रकाश शर्मा, रवींद्र नांदूरकर, खंडूदेव कठारे, सत्यपाल गोयल, संतोष ओझा यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मोर्चाचे संयोजन ॲड. नानिक पंजाबी, मनोहर जेठवानी, श्रीचंद नागरानी, ज्योतीका मलकानी आणि आतम प्रकाश मताई यांनी केले. सिंधी समाजातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने सहभागी होत फाळणीच्या काळातील विस्थापितांच्या स्मृतींना अभिवादन केले.

# १८ ऑगस्टला पिंपरी-चिंचवडमध्ये आरक्षण उपवर्गीकरणासाठी 'जनआक्रोश महामोर्चा'

- ५८ जातींचा सहभाग; मातंग समाजातील नेते, पदाधिकारीही उतरणार मैदानात
- चिंचवड स्टेशन ते निगडी तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा; सरकारने तातडीने अंमलबजावणी करावी, समितीची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

अनुसूचित जातीतील आरक्षणाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा आणि आरक्षणाचा न्याय्य वाटा सर्व घटकांना मिळावा, या मागणीसाठी आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ १८ ऑगस्ट रोजी पिंपरी-चिंचवडमध्ये 'जनआक्रोश महामोर्चा' काढण्यात येणार आहे. आरक्षण उपवर्गीकरण समर्थन समितीच्या वतीने आयोजित या महामोर्चात अनुसूचित जातीतील ५८ जातींचे प्रतिनिधी सहभागी होणार असून, मातंग समाजातील विविध नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते ही मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

आरक्षणाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान पद्धतीने पोहोचणे आवश्यक आहे. काही घटकांना आरक्षणाचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याने त्यांच्यापर्यंत हा लाभ पोहोचविण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असल्याची भूमिका समितीने मांडली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांनुसार समाजातील प्रत्येक घटकाला विकासाची समान संधी मिळणे गरजेचे असल्याचे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. उपवर्गीकरणाला काही संघटनांकडून विरोध होत असला, तरी आरक्षण काढून घेणे हा त्यामागील उद्देश नाही. आरक्षणाचा लाभ अधिक गरजू आणि वंचित घटकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, हा उपवर्गीकरणाचा हेतू असल्याचे समितीने सांगितले.

**वाल्मिकी, वडार, मादिगा समाजाचा पाठिंबा**

आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ काढण्यात येणाऱ्या या महामोर्चाला वाल्मिकी समाज, वडार समाज आणि मादिगा समाजानेही पाठिंबा दर्शविला आहे. या समाजांचे नेते व प्रतिनिधी पत्रकार परिषदेला उपस्थित होते. तसेच सामाजिक नेते मारुती पंढ्री, ॲड. सुशील मंचरकर आणि भारत विटकर यांचीही यावेळी उपस्थिती होती. विविध समाजघटकांच्या पाठिंब्यामुळे महामोर्चाला व्यापक स्वरूप प्राप्त होत असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

**सरकारने तातडीने निर्णय घ्यावा**

महाराष्ट्र सरकारने आरक्षण उपवर्गीकरणाबाबत लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी, अशी प्रमुख मागणी महामोर्चाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. अनुसूचित जातीतील ५८ जातींच्या प्रतिनिधींचा या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे समितीने सांगितले. तसेच महाराष्ट्रातील मातंग समाजातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्तेही महामोर्चात सहभागी होणार आहेत.

**चिंचवड स्टेशन ते निगडी तहसील कार्यालय**

मंगळवार, १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता चिंचवड स्टेशन येथील आद्यक्रांती गुरु लहुजी वस्ताद साळवे स्मारकापासून महामोर्चाला सुरुवात होणार आहे. तेथून मोर्चा निगडीच्या दिशेने रवाना होऊन निगडी तहसील कार्यालयासमोर त्याची सांगता होणार आहे. आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय तातडीने घेऊन त्याचा लाभ अनुसूचित जातीतील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, अशी मागणी सरकारकडे करण्यात येणार आहे. महामोर्चात अनुसूचित जातीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आरक्षण उपवर्गीकरण समर्थन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

**पत्रकार परिषदेला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

या संदर्भात झालेल्या पत्रकार परिषदेला आमदार अमित गोरखे, बापू घोलप, भाऊसाहेब आडागळे, संदिपान झोंबाडे, अनिल सौंदडे, ॲड. सुशील मंचरकर (वाल्मिकी समाज) नेताजी शिंदे, गणेश लोंढे, गणेश अवघडे, भारत विटकर (वडार समाज) मारुती पंद्री (मादिगासमाज) मनोज तोरडमल, मयूर जाधव, संदीप जाधव, चंद्रकांत लोंढे, मारुती जाधव, अविनाश शिंदे, बाबासाहेब रसाळ, बाबासाहेब पाटोळे, अरुण जोगदंड, संजय ससाने, नितीन घोलप, सुनील भिसे, सुरज कांबळे, आशाताई बापू वाघमारे, कृष्णा साबळे, शहाणे भानुदास नेटके, भगवान शिंदे, युवराज दाखले, सुरेश जोगदंड, शिवाजी साळवे, सतीश भवाळ, अविनाश लोणारी, संजय एडके, राजू आवळे, विठ्ठल झिंजुर्डे, नाना कांबळे, भाऊ कसबे, मारुती सोनटक्के, सागर कापसे, प्रसाद केसरे, स्वप्नील वाघमारे, मयूर घोलप, शंकर खवळे, ऋषी वाघमारे, शिवाजी खडसे, सुरज कांबळे, महादेव आडागळे, योगेश लोंढे यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने खराळवाडी येथील मध्यवर्ती कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी बहल यांनी देशाच्या एकता, विविधता आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व सांगत स्वातंत्र्यसैनिक व देशासाठी योगदान देणाऱ्या महामानवांचे स्मरण करण्याचे आवाहन केले.

यावेळी अकबर मुल्ला, राजेंद्र पवार, सचिन गायकवाड, अविनाश कुलकर्णी, महेश माने, राजू भीमा लोणके, दीपक कार्की, गणेश ताम्हाणे, राम खरात, ज्ञानेश्वर भालेकर, आकाश शेंडे, अमोल कदम, धनराज सूर्यवंशी व अमित थोरात यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली.




कार्यक्रमास योगेश बहल, भाऊसाहेब भोईर, कविता आल्हाट, सीमा सावळे, फजल शेख, विजय लोखंडे, सारंग कामतेकर, सतीश दरेकर, शेखर काटे, वर्षा जगताप, विक्रांत लांडे, राजेंद्र जगताप, निकिता कदम, सविता आसवानी, अथर्व कोकणे, कैलास बारणे, ॲड. सचिन औटे, ॲड. गोरक्ष लोखंडे, ज्ञानेश्वर कांबळे, शेरबहादूर उर्फ मायला खत्री, कविता खराडे, संगीता कोकणे, तुषार ताम्हाणे, विशाल काळभोर, दीपक साकोरे, रवींद्र ओव्हाळ, युवराज पवार, श्रीकांत कदम, युसुफ कुरेशी, संग्राम चव्हाण, प्रशांत महाजन, दत्तात्रय जगताप, अरुण पवार, शक्रुल्ला पठाण, संपत पाचुंदकर, तुकाराम बजबळकर, प्रवीण गव्हाणे, महेश झपके, बाळासाहेब पिल्लेवार, अंकुश दिघे, नवनाथ डफळ, काळुराम खेडकर, गोरोबा गुजर, लहू तोरणे, रवींद्र सोनवणे, बापू सोनवणे, जहीर उर्फ छोटू खान, महेश किर्वे, उदय कुलकर्णी, महेश माने, प्रा. संतोष भांगे, शहाजी आतकर, भाग्यश्री मस्के, नीलम कदम, देवी थोरात, क्षमा सय्यद, स्वराज शिंदे, इमरान शेख, अविनाश सोनवणे, उदय ववले, सुनील जाधव, रमजान सय्यद, धनाजी तांबे, सुनिल अडागळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# न्यू सिटी प्राईड इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्यदिनानिमित्त 'भव्य तिरंगा रॅली'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी : प्रतिनिधी**

क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले एज्युकेशन फाउंडेशन संचालित, न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूल रहाटणी येथे १५ ऑगस्ट उत्साहात साजरा करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभागचे सभापती सविता खुळे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार, सेक्रेटरी संदीप चाबुकस्वार, माजी पोलीस उपनिरीक्षक सुरेश भालेराव, उद्योजक अरुण डोईफोडे, ऑल इंडिया पँथर सेनेचे सचिव जितेश जगताप, कार्याध्यक्ष बाळासाहेब शेंडगे, डॉ. प्रियंका कोकणे, सामाजिक कार्यकर्ते युवराज प्रगने, मयूर ओव्हाळ, सागर शिनगारे शाळेचे उपमुख्याध्यापक सचिन कळसाईत यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते.

स्वातंत्र्य दिनानिमित्त हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीत शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच पालकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. रॅलीची सुरुवात शाळेच्या प्रांगणातून झाली. न्यू सिटी प्राईड स्कूल ते शिवार चौक ते स्कूल ह्या मार्गाने रॅली काढण्यात आली.

विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा घेऊन भारत माता की जय, वंदे मातरम अशा देशभक्तिपर घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.शाळेच्या बँड पथकाच्या तालावर विद्यार्थी अनुशासनबद्ध रचनेतून मार्गक्रमण करत शहरातील प्रमुख रस्त्यांवरून एकात्मतेचा व देशभक्तीचा संदेश देण्यात आला. रॅली दरम्यान पर्यावरण संवर्धन, स्वच्छ भारत, महिला सशक्तीकरण, शिक्षणाचे महत्त्व अशा सामाजिक संदेशांचे फलक विद्यार्थ्यांनी हातात घेतले होते.स्थानिक नागरिकांनी रॅलीचे स्वागत फुलांच्या वर्षावाने आणि टाळ्यांच्या गजरात केले.




प्री - प्राईमरीचे विद्यार्थीनी अरिका पवार, इयत्ता दुसरीचा चैतन्य कोरे, इयत्ता चौथीचा युग माने, इयत्ता सहावीची विद्यार्थिनी ईशानी सोळुंके या विद्यार्थ्यांनी भाषणे दिली . देशभक्तिपर गीत, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. कल्पना चौधरी आणि अनिता पाटील यांनी झेंडा गीत गायले. उर्मिला ठोंबरे मेघा विभुते आणि डिंपल काळे या शिक्षकांनी मराठी, हिंदी, इंग्रजी मध्ये माहिती देशाबद्दल सांगितली. तसेच पद्मश्री भूषण डॉ. डी वाय पाटील यांना श्रद्धांजली वाहिण्यात आली.वंदे मातरम म्हणून विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### आणे ग्रामसभेत जोरदार गोंधळ; ग्रामस्थांच्या प्रश्नांच्या भडक्याने प्रशासन पुरते कोंडीत!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

आणे गाव |प्रतिनिधी

येथील ग्रामसभेच्या दुसऱ्या भागात कमालीचा गोंधळ आणि अभूतपूर्व हायड्रामा पाहायला मिळाला. प्रलंबित प्रश्नांवरून संतप्त झालेल्या स्थानिक ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेत उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रश्नांच्या भडीमाराने पुरते घेरले. घटनेचे मुख्य मुद्दे:सभेत प्रचंड गदारोळ: ठरलेल्या नियोजनानुसार सुरू झालेली ग्रामसभा स्थानिक समस्यांवरून पेटली आणि पाहता पाहता सभेचे रूपांतर तीव्र गोंधळात झाले. प्रशासनाची कोंडी: स्थानिक नागरिकांनी गांभीर्याने विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना प्रशासकीय प्रतिनिधींची चांगलीच दमछाक झाली आणि ते नागरिकांच्या गराड्यात अडकले.जनतेचा तीव्र संताप: कारभारातील त्रुटी आणि दिरंगाईवर बोट ठेवत ग्रामस्थांनी विचारलेल्या टोकदार प्रश्नांमुळे सभेचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले.स्थानिक प्रशासनावर परिणाम:या गोंधळामुळे स्थानिक प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्यातील वाढता तणाव पुन्हा एकदा समोर आला आहे. नागरिकांच्या तीव्र विरोधामुळे आणि गोंधळाच्या वातावरणामुळे प्रशासनाला सभेपुढील अजेंडा बाजूला ठेवावा लागला, ज्यामुळे अनेक महत्त्वाचे स्थानिक ठराव तूर्तास रखडले आहेत.

# जुन्नर शहरात शिवसेना पदनियुक्ती सन्मान सोहळा उत्साहात

## नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मान; संघटना मजबूत करण्याचा निर्धार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

जुन्नर | प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची जुन्नर शहरातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने 'सन्मान निष्ठावंतांचा – शिवसैनिक पदनियुक्ती सन्मान सोहळा' शुक्रवारी, दि. १४ ऑगस्ट रोजी हाय स्पीड स्किल हब, कोंडाजी बाबा डेरे आश्रमाशेजारी, जुन्नर येथे उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात जुन्नर शहरातील विविध पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये महानगर संघटक, उपतालुका प्रमुख, उपशहर प्रमुख, युवासेना युवाधिकारी, विभाग प्रमुख आणि शाखा प्रमुखांचा समावेश आहे.

महानगर संघटक : बाळासाहेब सदाकाळ, उपतालुका प्रमुख : जालिंदर रासकर, उपशहर प्रमुख : संजय घोणे, सलीम मुलाणी, संजय ताजवे, बाळासाहेब पऱ्हाड, युवासेना जुन्नर शहर युवाधिकारी : आशीर्वाद गाडेकर, विभाग प्रमुख : मुकेश जाधव, कुमार खत्री, करण धोत्रे, आकाश परदेशी, श्रीकांत साळवे, किरण कर्डीले, सतीश वर्पे, अनिकेत कुटे, संदीप ताजणे.

शाखा प्रमुख : सुनील बनकर, संदेश होगे, रोहन कर्डीले, बाळासाहेब मंडलिक, सौरव तिकोणे, शिरीष ससाणे, सचिन शिंदे, विकास शिरसागर, सचिन जाधव, कैलास शेरकर, अभिलाष परदेशी, ओंकार खिलारी, स्वप्नील सरजिने आणि निरज भगत यांची नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाला शिवसेना पुणे जिल्हा सहसंपर्कप्रमुख दिलीपदादा बाम्हणे, पुणे जिल्हा संघटक शरद अण्णा चौधरी, उपजिल्हाप्रमुख ॲड. जयरामशेठ तांबे, जुन्नर विधानसभा प्रमुख आनंदभाऊ रासकर, तालुकाप्रमुख भास्करशेठ गाडगे, जुन्नर विधानसभा संघटक संदीपभाऊ ताजणे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती दिलीप डुंबरे, तालुका संघटक राहुलभाऊ सुकाळे, उपसभापती अमित ढोले, युवासेना उपजिल्हाधिकारी शांतारामशेठ सावंत, उपतालुका प्रमुख धोंडिभाऊ पानसरे आणि विभाग प्रमुख घोलप सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना दिलीपदादा बाम्हणे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने आणि जोमाने काम करून जुन्नर शहरात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढवावी, असे आवाहन केले. शहरातील प्रत्येक विभाग, शाखा तसेच तळागाळातील नागरिकांपर्यंत पक्षाचे विचार आणि भूमिका पोहोचवून संघटना अधिक सक्षम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

शहरप्रमुख शैलेश रमेश बनकर यांच्या पुढाकाराने आणि शिवसैनिकांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेविका सुवर्णाताई बनकर, गौरीताई शेटे, ज्योतीताई पऱ्हाड, महानगर समन्वयक शिवदर्शन खत्री, माजी शहरप्रमुख समीर भगत, निष्ठावंत शिवसैनिक




साईनाथ डोके, अमोल बनकर, प्रसाद बनकर, वैभव चौगुले, दिनेश ताजणे, सुदर्शन भगत, मोहन दिवेकर, शिवानंद ढेकणे, ओंकार भुजबळ, ऋषिकेश भुजबळ, अक्षय कुटे, जालिंदर साळवे यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी, सोशल मीडिया तसेच विविध अंगीकृत संघटनांचे आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे जुन्नर शहरातील शिवसेना संघटनेला नव्या नेतृत्वाची आणि संघटनात्मक बळकटीची जोड मिळाली आहे. आगामी काळात पक्षाचे कार्य अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

# शिरदाळेत ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

'स्वतंत्र भारताचा विजय असो', 'जय जवान, जय किसान', 'एक-दोन-तीन-चार, भारताचा जयजयकार' अशा देशभक्तीपर घोषणांनी आंबेगाव तालुक्यासह तालुक्याच्या पूर्व भागातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि गावांचा परिसर दणाणून गेला. शिरदाळे (ता. आंबेगाव) येथेही ८० वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला.



स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' ग्रुपच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे आणि स्वातंत्र्यदिनाचा आनंद त्यांच्यासोबत साजरा करणे, हा या उपक्रमामागील सामाजिक हेतू होता.

या उपक्रमाला ग्रामस्थ, महिला भगिनी तसेच 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्येही या उपक्रमामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' ग्रुपच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षांपासून शिरदाळे गावातील तलाव परिसर तसेच वनविभागाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात येत आहे. केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्यावरही ग्रुपकडून विशेष भर दिला जात असल्याची माहिती ग्रुपचे सदस्य सुशांत तांबे यांनी दिली.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने देशभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य

# मृत व्यक्तीच्या नावाने ३५ वर्षांनंतर जबाब? पुणे कार्यालयातील फेरफार नोंदीवर गंभीर प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी | प्रतिनिधी

पुणे कार्यालयातील महसूल नोंदीशी संबंधित एका प्रकरणामुळे प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. १९७९ मध्ये निधन झालेल्या व्यक्तीच्या नावाने तब्बल २०१४ मध्ये जबाब नोंदवण्यात आल्याचा धक्कादायक दावा समोर आला आहे. त्यामुळे संबंधित फेरफार नोंद नेमकी कोणत्या आधारावर करण्यात आली, असा सवाल उपस्थित होत आहे.

उपलब्ध कागदपत्रे आणि प्रतिलेखानुसार, संबंधित जमीन अथवा महसूल फेरफार प्रक्रियेत एका व्यक्तीचा जबाब महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून नोंदवण्यात आला. मात्र, ज्या व्यक्तीच्या नावाने हा जबाब नोंदवला गेला, त्यांचे निधन १९७९ मध्येच झाले असल्याचे नमूद आहे. अशा परिस्थितीत २०१४ मध्ये त्यांच्या नावाने जबाब कसा नोंदवण्यात आला, हा या प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा ठरत आहे.

मृत्यूनंतर तब्बल ३५ वर्षांनी संबंधित व्यक्तीने स्वतः उपस्थित राहून जबाब दिल्याची नोंद झाली असेल, तर ही बाब केवळ लिपिकीय चूक आहे की कागदपत्रांमध्ये फेरफार करण्यात आला, याची सखोल चौकशी होण्याची गरज आहे. महसूल नोंदींमध्ये अशा प्रकारची विसंगती राहिल्यास त्याचा थेट परिणाम जमीनमालकी आणि नागरिकांच्या हक्कांवर होऊ शकतो.

या प्रकरणातील मूळ कागदपत्रे, फेरफार नोंद, जबाबाची तारीख, स्वाक्षरी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी केलेली पडताळणी यांची स्वतंत्र तपासणी होणे आवश्यक आहे. विशेषतः १९७९ मधील मृत्यूची नोंद आणि २०१४ मध्ये नोंदवलेला जबाब यांची अधिकृत कागदपत्रांद्वारे पडताळणी केल्यास या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.

दरम्यान, या कथित अनियमिततेमुळे संबंधित महसूल कार्यालयातील नोंदणी प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. मृत व्यक्तीच्या नावाने जबाब नोंदवला गेला असल्याचा आरोप खरा ठरल्यास, त्यामागे केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा आहे की जाणीवपूर्वक कागदपत्रांमध्ये फेरफार करण्यात आला, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

मृत्यूनंतर व्यक्तीचा जबाब नोंदवला जातोच कसा? हा साधा प्रश्न आता या संपूर्ण प्रकरणाच्या केंद्रस्थानी आला आहे. त्यामुळे संबंधित विभागाने कागदपत्रांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# वर्टस फुटबॉल अकॅडमी तरुणाईला नवी दिशा देईल : प्रशांत जगताप

## वडगाव शेरीत स्वातंत्र्यदिनी अकॅडमीचे दिमाखात उद्घाटन; युनिटी फुटबॉल कपमध्ये विद्यांकुर स्कूल विजेते

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे | प्रतिनिधी :

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वडगाव शेरी येथील विद्यांकुर स्कूलच्या प्रांगणात वर्टस फुटबॉल अकॅडमीचे दिमाखदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी आयोजित युनिटी फुटबॉल कप २०२६ स्पर्धेला पुणे शहरातील तरुण खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

अकॅडमीचे कौतुक करताना काँग्रेस पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी, वर्टस फुटबॉल अकॅडमी तरुणाईला, विशेषतः जेन-झी पिढीला क्रीडा, शिस्त आणि सकारात्मक विचारांची नवी दिशा देईल, असा विश्वास व्यक्त केला.

माजी आमदार मोहन जोशी यांनीही अकॅडमीच्या उपक्रमाचे कौतुक केले. तरुणांना मोबाईल आणि आभासी जगापासून मैदानाकडे वळविण्यासाठी अशा क्रीडा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

वर्टस फुटबॉल अकॅडमीचे संस्थापक प्रशांत (लुकस) केदारी यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सामाजिक, क्रीडा, कला आणि साहित्य क्षेत्राशी जोडलेल्या केदारी यांच्या कार्याचा उल्लेख करत मान्यवरांनी त्यांच्या




तरुणांसाठी काहीतरी भरीव करण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले. युवा नेते अविनाश बागवे यांनीही अकॅडमीच्या ध्येयधोरणाला शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात प्रशांत (लुकस) केदारी यांनी अकॅडमीचे उद्दिष्ट स्पष्ट केले. पुण्यातील होतकरू खेळाडूंना फुटबॉलच्या माध्यमातून शहर, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. अकॅडमीच्या हेड कोचपदी जोएल अलेक्स यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

### युनिटी फुटबॉल कपमध्ये विद्यांकुर स्कूलचा शानदार विजय

युनिटी फुटबॉल कप २०२६ स्पर्धेत पुणे शहरातील २० हून अधिक संघांनी सहभाग घेतला. अंतिम सामन्यात विद्यांकुर स्कूलने ब्लू टायगर अकॅडमीचा पराभव करत विजेतेपद पटकावले. संपूर्ण स्पर्धेत खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, संघभावना आणि क्रीडावृत्तीचे दर्शन घडविले.

स्पर्धेतील रेफरीची जबाबदारी गॅरी, फ्रेडी आणि जॉन केदारी यांनी सांभाळली.

उद्घाटनप्रसंगी माजी आमदार मोहन जोशी, काँग्रेस पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, युवा नेते अविनाश बागवे, माजी नगरसेवक राजेंद्र शिरसाठ, सुनील मलके, फादर ॲलेक्स, राहुल डबाळे, सत्यवान गायकवाड, जॉर्ज पीटर, जॉन रूपवते, जॉय जोस, विमान नगर पोलीस स्टेशनचे पीआय अशोक शिरसाठ, रिफेन्स अल्फान्सो आदी मान्यवर उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ॲड. अंतोन कदम, मार्कस पंडित, जॉर्ज रॉड्रिक्स, संजय गायकवाड, राजेंद्र चक्रनारायण, दिलीप घुटे, अरुण केदारी, मेरी पारगे, अतुल धीवर, नरेश चव्हाण, राजकुमार सत्राळकर, सलोमी तोरणे, संगीता केदारी, नितीन भोसले, डेव्हिस देवदास, प्रवीण मॅथ्यू, सौदागर नवगिरे, स्टॅन्ली आदींनी परिश्रम घेतले.

### फुटबॉलच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाचा प्रयत्न

वर्टस फुटबॉल अकॅडमीचा उद्देश केवळ फुटबॉल प्रशिक्षण देणे एवढाच मर्यादित नसून, तरुणांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, संघभावना, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्याचे व्यासपीठ निर्माण करणे हा आहे.

प्रशांत (लुकस) केदारी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या उपक्रमामुळे पुण्यातील अनेक होतकरू खेळाडूंना भविष्यात मोठ्या स्तरावर खेळण्याची संधी मिळण्याची अपेक्षा आहे. मैदानावरची ऊर्जा योग्य दिशेने वळवून तरुणाईला सकारात्मक भविष्याशी जोडण्याचा प्रयत्न म्हणून वर्टस अकॅडमीचा हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

# नोकरी मागणारे नव्हे, नोकऱ्या निर्माण करणारे अभियंते घडवा!'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे | प्रतिनिधी

अभियंत्यांनी केवळ रोजगाराच्या शोधात राहण्याऐवजी तंत्रज्ञान, उद्योग आणि संस्थांच्या माध्यमातून इतरांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी केले. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते.

सीओईपीने केवळ तंत्रज्ञान शिक्षण देणारी संस्था न राहता तांत्रिक विचार, संशोधन, नवोपक्रम आणि समस्या सोडवण्याचे जागतिक केंद्र बनण्याची महत्त्वाकांक्षा ठेवावी, असे राज्यपालांनी सांगितले. स्वच्छ ऊर्जा, जलसुरक्षा, प्रदूषण, शाश्वत वाहतूक, प्रगत उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर आणि हवामान बदल यांसारख्या क्षेत्रांतील आव्हानांकडे नव्या संधी म्हणून पाहण्याचे आवाहन त्यांनी केले.

सीओईपीच्या माजी विद्यार्थ्यांना संस्थेची मोठी ताकद असल्याचे सांगत, त्यांच्या बौद्धिक भांडवलाचा उपयोग प्रयोगशाळा, विद्यार्थी आणि स्टार्टअप परिसंस्थेशी जोडला गेल्यास संशोधन आणि नवोपक्रमाला मोठी चालना मिळू शकते, असे राज्यपाल म्हणाले. उद्योग, सरकार, संशोधन संस्था आणि विद्यापीठांनी एकत्रितपणे काम करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सीओईपीकडून आयआयटीच्या दर्जाचे समाजोपयोगी संशोधन आणि मोठ्या प्रमाणावर पेटंट मिळवून देणाऱ्या प्रकल्पांची अपेक्षा व्यक्त केली. विद्यापीठाची विद्यार्थी संख्या १० हजारांपर्यंत वाढवावी तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विकसित करावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सीओईपीच्या चिखली कॅम्पसमध्ये स्वतंत्र संशोधन व्यवस्था उभारण्यात येणार असून त्यासाठी शासनाकडून आर्थिक पाठबळ दिले जाणार आहे. सीएसआरच्या माध्यमातूनही निधी उभारला जाणार असल्याचे पाटील यांनी सांगितले. विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहाची कमतरता लक्षात घेऊन ४०० विद्यार्थीनींच्या क्षमतेचे नवीन वसतिगृह उभारण्याची घोषणा पाटील यांनी केली. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या १० विद्यार्थीनींना दरमहा १० हजार रुपये याप्रमाणे दहा महिन्यांसाठी आर्थिक मदत देण्यात येणार आहे. तसेच 'कमवा आणि शिका' योजनेअंतर्गत ५० विद्यार्थ्यांना दरमहा दोन हजार रुपयांचे मानधन मिळेल, अशी घोषणाही त्यांनी केली. मुलींच्या उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आठ लाख रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींचे शिक्षण व परीक्षा शुल्क माफ करण्याच्या निर्णयाचा सकारात्मक परिणाम झाल्याचेही पाटील यांनी सांगितले. दोन वर्षांपूर्वी उच्च शिक्षणातील मुला-मुलींच्या सहभागातील १६ टक्क्यांचा फरक गेल्या वर्षी साडेतीन टक्क्यांवर आल्याचा दावा त्यांनी केला. सीओईपीचे नियामक मंडळाचे अध्यक्ष विनायक पै यांनी विद्यापीठ मूलभूत संशोधन, उत्पादन विकास आणि मानवी कौशल्यांवर भर देत असल्याचे सांगितले. चिखली येथे उभारण्यात येणारे संशोधन संकुल महाराष्ट्रातील अग्रगण्य संशोधन केंद्रांपैकी एक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# जखमांवर मात करत नवी उंची गाठणाऱ्या जवानांना राज्यपालांची सलामी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

युद्ध अथवा सैन्य मोहिमेदरम्यान दिव्यांगत्व आलेल्या जवानांचे शारीरिक आणि मानसिक पुनर्वसन करून त्यांना पुन्हा आत्मविश्वासाने उभे करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य खडकी येथील 'पॅराप्लेजिक' पुनर्वसन केंद्रात सुरू आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी या केंद्राला भेट देऊन पुनर्वसनाच्या विविध उपक्रमांची माहिती घेतली आणि दिव्यांग जवानांच्या जिद्दीला सलाम केला.

यावेळी दक्षिण महाराष्ट्र व गोवा सब एरियाचे जनरल ऑफिसर कमांडिंग मेजर जनरल विशाल अग्रवाल आणि संस्थेचे संचालक कर्नल रतन कुमार मुखर्जी यांच्यासह संबंधित अधिकारी



उपस्थित होते.

युद्ध तसेच विविध सैन्य मोहिमांमध्ये कार्यरत असताना दिव्यांगत्व आलेल्या जवानांना शारीरिक उपचारांसोबत मानसिक आधार देण्याचे काम केंद्रात केले जाते. पुनर्वसनानंतर अनेक जवानांनी क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राज्यपालांनी अशा दिव्यांग खेळाडूंशी संवाद साधत त्यांच्या संघर्षाची आणि यशाची माहिती जाणून घेतली.

केंद्रातील दिव्यांग खेळाडूंनी राष्ट्रीय, राज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळवलेल्या यशाची छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली आहेत. राज्यपालांनी या छायाचित्र दालनाला भेट देऊन जवानांच्या कामगिरीची पाहणी केली.

दिव्यांगत्व म्हणजे आयुष्याचा शेवट नसून नव्या संघर्षाची सुरुवात असते, याचा प्रत्यय केंद्रातील जवानांच्या कार्यातून येतो. पुनर्वसनानंतर अनेक जवानांनी क्रीडा, कला आणि विविध कौशल्यांच्या माध्यमातून स्वतःची नवी ओळख निर्माण केली आहे.

राज्यपालांनी केंद्रातील दिव्यांग जवानांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचीही पाहणी केली. विशेषतः माउथ पेंटिंगच्या माध्यमातून चित्रकलेचा छंद जोपासणाऱ्या जवानांशी त्यांनी संवाद साधला आणि त्यांच्या कलाकृतींचे कौतुक केले.

# आंबेगाव तालुका कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेची सभा उत्साहात संपन्न

■ लोणी-धामणी : प्रतिनिधी

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांसमोर निवृत्ती वेतन, मान्यता यांसह अनेक गंभीर प्रश्न प्रलंबित असून, या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शिक्षकांनी संघटनेवर विश्वास ठेवून एकजुटीने संघटनेच्या पाठीशी उभे राहणे गरजेचे आहे. शासन शिक्षण व्यवस्थेकडे दुर्लक्ष करीत असल्याचे मत महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे राज्य सरचिटणीस प्रा. लक्ष्मण रोडे यांनी व्यक्त केले.

आंबेगाव तालुका कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालय व ज्युनियर कॉलेज, मंचर येथे उत्साही वातावरणात पार पडली. यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. रोडे बोलत होते.

सभेत त्यांनी महाराष्ट्रातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या राज्यस्तरीय विविध प्रलंबित मागण्या, शैक्षणिक धोरणे आणि शिक्षकांसमोरील प्रश्नांवर सविस्तर मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या हक्कांसाठी संघटितपणे लढा देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

पुणे जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे सहचिटणीस प्रा. रामानंद वळसे पाटील यांनी जिल्हास्तरीय संघटनात्मक कामाचा आढावा घेत शिक्षकांच्या एकजुटीचे महत्त्व स्पष्ट केले. तालुका संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुनील थोरात यांनी अध्यक्षीय भाषणातून तालुक्यातील शिक्षकांच्या विविध समस्यांवर प्रकाश टाकत संघटना शिक्षकांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रामदास तनपुरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शिवदत्त जोरी यांनी केले, तर आभार प्रा. राजेंद्र भोर यांनी मानले. यावेळी आंबेगाव तालुक्यातील विविध कनिष्ठ महाविद्यालयांमधील शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत विविध शैक्षणिक व संघटनात्मक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. अत्यंत खेळीमेळीच्या आणि उत्साही वातावरणात सभेची सांगता झाली.

## सारांश वृत्त

### नवी दिल्ली : प्रतिनिधी

### चाकणची अवस्था पाहून आदित्य ठाकरेंना तुकाराम मुंडेंची आठवण..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

चाकण : प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील चाकण औद्योगिक पट्ट्यातील समस्यांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकार आणि प्रशासनाला लक्ष्य केले. चाकण एमआयडीसी परिसराची पाहणी केल्यानंतर त्यांनी रस्ते, वाहतूक कोंडी, कचरा, वीजपुरवठा आणि प्रशासकीय समन्वयाच्या प्रश्नांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. उद्योगांना आवश्यक सुविधा मिळत नसतील, तर त्याचा परिणाम गुंतवणूक आणि रोजगारावर होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. चाकण परिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक विकास झाला असला, तरी त्या तुलनेत मूलभूत पायाभूत सुविधांचा विकास झालेला नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले. रस्त्यांची खराब अवस्था आणि वाढती अवजड वाहतूक यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. आदित्य ठाकरे पुढे म्हणाले, आपण सगळे आज बघतोय, एक चांगला अधिकारी नाहीत. एक व्यक्ती द्या, हे सगळं सुधारेल.यावेळी त्यांनी तुकाराम मुंढे यांचा उल्लेख करत ते म्हणाले, तुकाराम मुंढे यांच्यासारखे चांगले अधिकारी द्या, अशीही मागणी त्यांनी केली. प्रशासनाने प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेऊन नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. चाकण औद्योगिक परिसरातील सुमारे २० उद्योग बाहेर जाण्याच्या मानसिकतेत असल्याचा दावा आदित्य ठाकरे यांनी केला. उद्योगांनी स्थलांतर केले किंवा त्यांचे कामकाज कमी झाले, तर त्याचा थेट परिणाम स्थानिक रोजगारावर होईल. त्यामुळे केवळ नवीन उद्योग आणण्याच्या घोषणा करण्यापेक्षा विद्यमान उद्योग टिकवण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. चाकणमध्ये औद्योगिक वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी, वीजपुरवठ्याशी संबंधित अडचणी आणि कचऱ्याच्या समस्येमुळे उद्योग तसेच स्थानिक नागरिक त्रस्त असल्याचे ठाकरे यांनी नमूद केले.

# सरकारी मालमत्ता ४२.७६ लाख कोटींची, पण विभागात ४3 टक्के पदे रिक्त!

## सरकारी यंत्रणेच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

देशाच्या लाखो कोटी रुपयांच्या सार्वजनिक मालमत्तेचे व्यवस्थापन करणाऱ्या गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्ता व्यवस्थापन विभागाची अवस्था पाहिली, तर सरकारच्या आर्थिक व्यवस्थापनाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. संसदेच्या स्थायी वित्त समितीने या विभागातील तब्बल ४३ टक्के रिक्त पदांवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, ३८ रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची शिफारस केली आहे.

या विभागाची मंजूर कर्मचारीसंख्या ८९ असताना प्रत्यक्षात केवळ ५१ अधिकारी कार्यरत आहेत. म्हणजेच ३८ पदे रिक्त आहेत. मार्चमध्ये समितीने याबाबत स्पष्ट इशारा दिला होता. मात्र ऑगस्ट उजाडला तरी परिस्थितीत कोणतीही ठोस सुधारणा झालेली नाही. त्यामुळे समितीने सरकारच्या निष्क्रियतेवर थेट बोट ठेवले आहे.

आणि हा काही एखाद्या छोट्या सरकारी कार्यालयाचा प्रश्न नाही. या विभागाच्या अखत्यारीतील सार्वजनिक मालमत्तेचा पोर्टफोलिओ तब्बल ४२.७६ लाख कोटींहून अधिक आहे. एवढ्या प्रचंड आर्थिक मालमत्तेचे व्यवस्थापन करणाऱ्या विभागात जवळपास निम्म्यापेक्षा कमी कर्मचारी कार्यरत असतील, तर सरकारने नेमक्या कोणत्या कार्यक्षमतेचा दावा करायचा?

याहून गंभीर बाब म्हणजे आयडीबीआय बँकेच्या विक्रीसारखे गुंतागुंतीचे व्यवहार, तसेच केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचे महत्त्वाचे सामंजस्य करार अंतिम करण्याची जबाबदारी याच विभागावर आहे. अधिकारीच अपुरे असतील, तर निर्णयप्रक्रियेचा वेग, व्यवहारांची गुणवत्ता आणि सार्वजनिक मालमत्तेच्या मूल्याचे संरक्षण याबाबत प्रश्न उपस्थित होणारच.

संसदीय समितीने केवळ प्रशासकीय पत्रव्यवहार न करता तातडीने कृती करण्याची मागणी केली आहे. ४२.७६ लाख कोटींची मालमत्ता सांभाळण्यासाठी केवळ ५१ अधिकारी पुरेसे आहेत, असा सरकारचा समज असेल, तर ही केवळ प्रशासकीय कमतरता नाही; ही आर्थिक व्यवस्थापनातील गंभीर बेफिकिरी आहे.

सरकारने खासगीकरण, निर्गुंतवणूक आणि सार्वजनिक मालमत्तेच्या कार्यक्षम वापराचे मोठमोठे दावे करण्यापूर्वी या विभागातील ३८ रिक्त खुर्च्या भराव्यात. कारण खुर्च्या रिकाम्या ठेवून लाखो कोटी रुपयांच्या सार्वजनिक संपत्तीचे भविष्य ठरवता येत नाही!

## खोट्या दाव्यांना एफएसएसएआयचा दणका! सहा कंपन्यांना नोटीस; दिशाभूल करणारी लेबले आणि ट्रेडमार्क मागे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

अन्नपदार्थांच्या जाहिरातींमध्ये आणि पॅकेजिंगवर ग्राहकांची दिशाभूल करणारे दावे करणे आता कंपन्यांना महागात पडू शकते. १६ ऑगस्ट २०२६ रोजी भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाने एफएसएसएआयने सहा अन्न व्यवसायिक कंपन्यांनी नियामकाच्या कारवाईनंतर तातडीने सुधारात्मक पावले उचलल्याची माहिती दिली आहे.

एफएसएसएआयने सामाजिक माध्यमांवरील पोस्टद्वारे ही माहिती जाहीर केली. कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित कंपन्यांना नोटिसा बजावण्यात आल्यानंतर त्यांनी दिशाभूल करणारी लेबले आणि ट्रेडमार्क मागे घेण्यासह आवश्यक सुधारणा केल्याचे प्राधिकरणाने म्हटले आहे. ही कारवाई महत्त्वाची आहे, कारण अन्नपदार्थांच्या पॅकेटवर लिहिलेला प्रत्येक दावा ग्राहकाच्या निर्णयावर थेट परिणाम करतो. एखाद्या उत्पादनाला विशिष्ट आरोग्यदायी गुणधर्म असल्याचे भासवणे, प्रत्यक्ष स्वरूपापेक्षा वेगळी प्रतिमा निर्माण करणे किंवा ग्राहकांना चुकीची माहिती देणारे नाव आणि चिन्ह वापरणे, यामुळे ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता निर्माण होते. एफएसएसएआयच्या नोटिसीनंतर सहा कंपन्यांनी तातडीने दुरुस्ती केली, ही बाब नियामकाच्या दबावाचा परिणाम मानली जात आहे. मात्र प्रश्न असा आहे की, कंपन्यांनी स्वतः हून ग्राहकांची दिशाभूल थांबवली असती का, की नियामकाची नोटीस मिळाल्यानंतरच कायद्याची आठवण झाली? अन्न बाजारपेठ दिवसेंदिवस मोठी होत असताना ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित दावे अधिक जबाबदारीने केले जाणे आवश्यक आहे. आकर्षक नाव, भडक जाहिरात आणि पॅकेजिंगच्या आडून उत्पादनाचे वास्तव लपवण्याचा प्रयत्न झाला, तर त्याचा थेट फटका ग्राहकांना बसतो.

## व्हेनेझुएलात ओएनजीसीची पुन्हा एंट्री! अमेरिकेची परवानगी; आता तेल प्रकल्पांवर ताब्याची नजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

अमेरिकेच्या निर्बंधांच्या सावटाखाली वर्षानुवर्षे अडकलेल्या व्हेनेझुएलातील भारतीय तेल गुंतवणुकीला अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. सरकारी मालकीच्या तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाला म्हणजेच ओएनजीसीला अमेरिकेच्या अर्थ मंत्रालयाच्या परदेशी मालमत्ता नियंत्रण कार्यालयाकडून व्हेनेझुएलामधील पूर्ण कामकाज पुन्हा सुरू करण्यासाठी परवानगी मिळाली आहे. त्यामुळे व्हेनेझुएलातील ओएनजीसीच्या प्रकल्पांवरील निर्बंधांचा मोठा अडथळा दूर झाला आहे.

याचा अर्थ केवळ बंद पडलेली कामे पुन्हा सुरू होणार एवढाच नाही. ओएनजीसी आता व्हेनेझुएलामधील तेल उत्पादन वाढवण्याच्या, नवीन करार करण्याच्या आणि काही तेल प्रकल्पांचे प्रत्यक्ष संचालन आपल्या हातात घेण्याच्या तयारीत आहे. कंपनीचे वित्त संचालक अनुपम अग्रवाल यांनी गुंतवणूकदारांशी झालेल्या चर्चेत ही शक्यता स्पष्ट केली आहे.

मात्र या संपूर्ण घडामोडीकडे केवळ व्यावसायिक विजय म्हणून पाहणे धोकादायक ठरेल. कारण व्हेनेझुएला हा अमेरिकेच्या निर्बंधांच्या राजकारणाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू राहिला आहे. त्यामुळे आज मिळालेली परवानगी उद्याच्या भू-राजकीय समीकरणांमध्ये किती काळ टिकेल, हा प्रश्न कायम आहे.

भारतासाठी मात्र ही संधी महत्त्वाची आहे. परदेशातील तेलसाठ्यांमध्ये भारतीय सरकारी कंपनीची उपस्थिती वाढणे म्हणजे देशाच्या ऊर्जा सुरक्षेला बळ मिळण्याची शक्यता. उत्पादन वाढले, तर भारताच्या दीर्घकालीन तेलपुरवठ्याच्या धोरणालाही त्याचा फायदा होऊ शकतो.

पण खरी कसोटी आता सुरू झाली आहे. अमेरिकेची परवानगी मिळवणे हा पहिला टप्पा होता. व्हेनेझुएलातील राजकीय अस्थिरता, बदलते निर्बंध आणि तेथील सरकारी तेल कंपनीसोबतचे संबंध सांभाळत प्रत्यक्ष तेल उत्पादन वाढवणे ही ओएनजीसीसमोरील पुढची मोठी परीक्षा असेल.

# हसीनांच्या प्रत्यार्पणावर अडली भारत-बांगलादेश मैत्री?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

भारत-बांगलादेश संबंधांमध्ये पुन्हा एकदा तणावाची ठिणगी पडली आहे. बांगलादेशचे पंतप्रधान तारीक रहमान भारताचा दौरा करणार नाहीत, जोपर्यंत भारताने माजी पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेशच्या ताब्यात दिलेले नाही, अशी स्पष्ट भूमिका बांगलादेशने रविवारी घेतली. म्हणजेच आता राजनैतिक संबंधांचा एक महत्त्वाचा दरवाजा थेट हसीना यांच्या प्रत्यार्पणाशी जोडला गेला आहे.

शेख हसीना २०२४ मधील हिंसक सरकारविरोधी आंदोलनानंतर बांगलादेशातून भारतात आल्या आणि तेव्हापासून त्या भारतात आहेत. हसीना यांच्या उपस्थितीमुळे ढाका आणि नवी दिल्ली यांच्यातील संबंध आधीच तणावपूर्ण झाले आहेत.

आता बांगलादेशने आपल्या पंतप्रधानांच्या भारतभेटीवरच अट घातल्याने हा वाद केवळ व्यक्तीपुरता राहिलेला नाही; तो दोन देशांच्या परराष्ट्र धोरणाचा प्रश्न बनला आहे.

विशेष म्हणजे तारीक रहमान यांनी पंतप्रधानपद स्वीकारल्यानंतर मलेशिया आणि चीनचा दौरा केला; मात्र बांगलादेशी नेत्यांच्या परंपरेप्रमाणे पहिला परदेश दौरा भारताचा झाला नाही. हा बदल स्वतःच ढाक्याच्या बदलत्या राजनैतिक प्राधान्यांचा संकेत मानला जात आहे.



बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने भारतासोबत अलीकडे चर्चा सुरू असल्याचे मान्य केले आहे. मात्र हसीना यांच्या माध्यमांमधील सार्वजनिक वक्तव्यांमुळे या प्रक्रियेला धक्का बसल्याचेही अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. त्यामुळे ढाक्याची भूमिका स्पष्ट आहे भारताकडून केवळ राजनैतिक सद्भावनेची अपेक्षा नाही, तर हसीना यांच्या प्रत्यार्पणावर ठोस निर्णय हवा आहे.

पण भारतासाठीही हा प्रश्न तितकाच गुंतागुंतीचा आहे. हसीना यांचे भवितव्य, बांगलादेशातील राजकीय स्थैर्य आणि भारताच्या सुरक्षाविषयक हितसंबंधया तिन्हींचा समतोल साधणे नवी दिल्लीसाठी मोठी कसोटी ठरणार आहे.

कारण शेजारी बदलला की सीमा बदलत नाही; पण राजकारण बदलले की संबंधांची समीकरणे नक्कीच बदलतात. आता प्रश्न एवढाच भारत-बांगलादेश संबंधांची किंमत शेख हसीना ठरवणार की दोन्ही देशांचे दीर्घकालीन हित?

## राहुल गांधींच्या कथित बेहिशेबी मालमत्ता प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात उद्या सुनावणी! उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याशी संबंधित कथित बेहिशेबी मालमत्तेचा आरोप आता थेट सर्वोच्च न्यायालयाच्या दारात पोहोचला आहे. १७ ऑगस्ट २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होणार असून, अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला राहुल गांधी यांनी दिलेले आव्हान न्यायालयासमोर मांडले जाणार आहे.

अलाहाबाद उच्च न्यायालयाने कथित बेहिशेबी मालमत्तेच्या आरोपांची पडताळणी करण्यासाठी केंद्रीय अन्वेषण विभाग आणि सक्तवसुली संचालनालयाला आवश्यक तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. याच आदेशाविरोधात राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या १७ ऑगस्टच्या कारणसूचीत हे प्रकरण समाविष्ट करण्यात आले आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या तीन सदस्यीय पीठासमोर या याचिकेवर सुनावणी होणार आहे.

या प्रकरणाचे राजकीय महत्त्व त्यामुळे मोठे आहे. राहुल गांधी हे केंद्र सरकार आणि सत्ताधारी पक्षाविरोधात सातत्याने आक्रमक भूमिका घेत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या विरोधातील आर्थिक आरोपांची न्यायालयीन चौकशी हा केवळ कायदेशीर मुद्दा न राहता राजकीय संघर्षाचाही भाग बनला आहे. मात्र येथे सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे आरोप आणि दोषसिद्धी यामध्ये फरक आहे. न्यायालयीन प्रक्रियेत आरोपांची पडताळणी होणे म्हणजे संबंधित व्यक्ती दोषी ठरली, असा त्याचा अर्थ होत नाही. त्यामुळे या प्रकरणात तथ्य काय आहे, आरोपांचे पुरावे किती ठोस आहेत आणि तपास यंत्रणांना नेमकी कोणती भूमिका बजावता येईल, हे न्यायालयीन प्रक्रियेत स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

१७ ऑगस्टची सुनावणी त्यामुळे राहुल गांधींसाठीच नव्हे, तर तपास यंत्रणांच्या अधिकारांच्या मर्यादा आणि राजकीय व्यक्तींवरील चौकशीच्या प्रक्रियेबाबतही महत्त्वाची ठरू शकते. आता सर्वोच्च न्यायालय काय म्हणते, याकडे राजकीय आणि कायदेशीर वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## डेक्कन जिमखान्यावरील फ्लाईंग जिप्सीमध्ये पहाटे ४ वाजता पुन्हा राडा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे । प्रतिनिधी

सातत्याने पहाटेपर्यंत कॅफे उशिरा ठेवल्याने वादात सापडलेल्या डेक्कन जिमखाना येथील फ्लाईंग जिप्सी या कॅफेवर १५ ऑगस्टच्या पहाटे ४ वाजता पुन्हा राडा झाला. त्यात एका तरुणावर कोयत्याने वार करुन त्याला गंभीर जखमी केल्याचा प्रकार समोर आला आहे. अथर्व जगताप (वय १९) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. फ्लाईंग जिप्सी हा नेहमी पहाटेपर्यंत सुरु असल्याच्या वारंवार तक्रारी पोलिसांकडे येत असतात. शासनाने ठरवुन दिलेल्या वेळेपेक्षा उशिरापर्यंत कॅफे सुरु ठेवल्याबद्दल गेल्या वर्षी २०२५ मध्ये २ खटले दाखल करण्यात आले होते. या वर्षी २०२६ मध्ये आतापर्यंत ६ खटले दाखल करण्यात आले आहेत. यापूर्वी फ्लाईंग जिप्सी कॅफे उशिरापर्यंत सुरू ठेवल्याने तेथील काऊंटरवरील कप पोलीसाने काठीने खाली पडल्याने पोलीस उपनिरीक्षक संदीप कदम यांना २९ जून २०२६ रोजी निलंबित केले होते. या घटनेची सत्यता तपासल्यानंतर त्यांचे निलंबन मागे घेण्यात आले होते. या कॅफेमध्ये सातत्याने वादविवाद होत असते व ते उशिरापर्यंत चालू राहत असते. १५ ऑगस्ट २०२६ रोजी हे कॅफे पहाटे ४ वाजेपर्यंत सुरु होते. तेथे अनेक तरुण तरुणी ये जा करीत होते.

# परदेशातील लपवलेली मालमत्ता जाहीर करा, कर भरा आणि कारवाई टाळा! छोट्या करदात्यांसाठी केंद्राची एकदाच संधी; ३१ डिसेंबर अंतिम मुदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

चेन्नई / प्रतिनिधी

परदेशात उत्पन्न किंवा मालमत्ता लपवून ठेवलेल्या छोट्या करदात्यांसाठी केंद्र सरकारने एक महत्त्वाची, पण तितकीच प्रश्न निर्माण करणारी करमाफी योजना रविवार, १६ ऑगस्ट २०२६ पासून सुरू केली आहे. ही योजना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत खुली राहणार आहे. विशेष म्हणजे या योजनेचा उद्देश मोठ्या करचुकवेगिरी करणाऱ्यांपेक्षा विद्यार्थी, अनिवासी भारतीय आणि तुलनेने लहान करदात्यांना परदेशातील अघोषित आर्थिक मालमत्ता जाहीर करण्याची संधी देणे हा आहे.

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. आता तिची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली आहे. मात्र, सरकारने करदात्यांना दिलेली ही संधी म्हणजे केवळ सवलत नाही; अघोषित परदेशी संपत्ती करव्यवस्थेत आणण्याचा हा एक प्रकारचा शेवटचा इशाराही मानला जात आहे.

या योजनेअंतर्गत ज्या करदात्यांनी १ कोटी रुपयांपर्यंतचे अघोषित परदेशी उत्पन्न लपवले आहे, ते ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत या योजनेचा लाभ घेऊ शकतात. मात्र त्यासाठी त्यांना त्या उत्पन्नावर ३० टक्के कर आणि त्याच रकमेइतका म्हणजे आणखी ३० टक्के दंड भरावा लागणार आहे. म्हणजेच अघोषित उत्पन्नाच्या एकूण ६० टक्के रकमेचा भार करदात्यावर येणार आहे.

याशिवाय, एखाद्या करदात्याने ५ कोटी रुपयांपर्यंतची परदेशातील मालमत्ता खरेदी केली असेल आणि त्या मालमत्तेवर भारतात आधीच कर भरला असेल, पण प्राप्तिकर विवरणपत्रात ती मालमत्ता दाखवली नसेल, तर अशा प्रकरणांनाही या एकदाच मिळणाऱ्या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे. अशा वेळी



१ लाख रुपये निश्चित रक्कम भरून मालमत्ता जाहीर करता येणार आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे या मालमत्तेचे बाजारमूल्य ३१ मार्च २०२६ रोजीच्या मूल्यांकनानुसार निश्चित केले जाणार आहे. त्यामुळे मालमत्ता ज्या किमतीला खरेदी केली होती, तीच किंमत अंतिम मानली जाणार नाही. सरकारचा दावा असा आहे की या योजनेमुळे छोट्या करदात्यांना भीतीशिवाय आपली माहिती दुरुस्त करण्याची संधी मिळेल आणि करव्यवस्थेत पारदर्शकता वाढेल. पण दुसरीकडे प्रश्नही तितकाच गंभीर आहेज्यांनी परदेशातील संपत्ती लपवली, त्यांना आता स्वतः हून ती जाहीर करण्यासाठी सरकारने पुन्हा एक संधी का द्यावी? मोठ्या प्रमाणावरील करचुकवेगिरीविरोधात कठोर कारवाईची भाषा करणाऱ्या सरकारने छोट्या करदात्यांसाठी ही मोकळीक दिली आहे. त्यामुळे ही योजना करदात्यांना सुधारण्याची संधी आहे की करचुकवेगिरीनंतर दिलेला सरकारी सौम्य इशारा? याचे उत्तर आगामी काळात मिळेल. मात्र अंतिम मुदत स्पष्ट आहे३१ डिसेंबर २०२६. त्यानंतर ही संधी राहणार नाही.